निशाणी क्र. २६

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ६ (PW–६) यांची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

नाव – निर्मला विजय चोपडे,

वय – ६३ वर्षे,

व्यवसाय – भिक्षुकी

राहणार – नांदुरा, तालुका – नांदुरा, जिल्हा– बुलढाणा.

– – – – –

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री . व्ही एम बापट यांचेमार्फत..</u>**

१. मी पूर्वी नारायणपूर येथे राहत होते. विष्णू आत्माराम खैरे यांना मी ओळखते. माझ्या आणि विष्णू याच्या घरामध्ये पाच ते सहा घरे आहेत. त्याचे लग्न झाले होते आणि तीन ते चार मुले आहेत. विष्णूचे वडील त्यांच्यासोबत राहत होते. विष्णूची पत्नी स्वभावाने चांगली होती. घटना काय घडली होती ते मला माहिती नाही. विष्णूची पत्नी जिवंत नाही. तिचे वर्षा नाव होते. ती कशी वारली ते मला माहिती नाही. ती वारल्यानंतर मी तिच्या घरी गेले नव्हते. विष्णू खैरे यांनी वर्षा हिला मारल्या संदर्भात मला काही माहिती नाही. त्याचा एक मुलगा पहिल्या वर्गात जात होता आणि दुसरा मुलगा दुसऱ्या वर्गात जात होता. बाकीची मुले लहान होती. ती मुले घरीच राहत असत. त्या मुलांची नावे मला काही आठवत नाहीत.

(भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ मधील तरतुदीनुसार साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी शासकीय अभियोक्ता यांच्या विनंतीवरून देण्यात आली.)

२.		पोलिसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. पण मला त्याबद्दल काहीही माहिती नव्हते. हे खरे आहे की नंदाबाई ढगे ही बाई विष्णूच्या घरी जात असे आणि ती विष्णू पत्नीस मारू देत नसेल. हे खरे नाही की दिनांक २८/०५/२०२१ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास मी घरी हजर असताना मला वर्षाच्या किंकाळ्या चा आवाज यांनी सुरू झाला. हे खरे नाही की अंदाजे दोन एक घंटे आवाज राहून राहून येत होता आणि तेव्हा मला समजले की आज सुद्धा नेहमीप्रमाणे विष्णू हा त्याची पत्नी वर्षा हिला मारहाण करत आहे. आता मला वाचून दाखवण्यात आलेला माझ्या पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "अ" हा खरा नाही. तसे मी पोलिसांना सांगितले नव्हते. ते पोलिसांनी माझ्याजबाबत का लिहिले ते सांगू शकत नाही.

३.		नंदाबाई हिला त्या दिवशी आवाज आला असेल आणि गेली असेल. हे मला माहिती नाही की विष्णू ने नंदाबाईला घराबाहेर धक्का मारून बाहेर काढले. हे खरे आहे की नंदाबाईला घरातून काढून दिले असे मी तिच्याकडून ऐकले होते. हे खरे नाही की काही वेळाने वर्षाचा आवाज येणे बंद झाले व आत्माराम खैरे यांनी आम्हाला सांगितले की पिंट्याने वर्षाला बेदम मारहाण करून जीवे ठार मारले आहे व तेव्हा आम्हाला समजले की वर्षा वारली. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "ब" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस जबाबात का आला ते मी सांगू शकत नाही.

४.		हे खरे आहे की आत्माराम खैरे आज कोर्टात आला आहे. तो बाहेर बसलेला आहे. त्याचे माझ्याशी बोलणे झाले नाही. हे खरे नाही की विष्णू याला शिक्षा होऊ नये म्हणून त्याच्या सांगण्यावरून आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

<u>**आरोपीच्या तर्फे उलट तपास विधिज्ञ श्री जे. डी. तायडे यांच्याकडून नाकारला.**</u>

उलटतपास नाकारला

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.15 17:45:28 +0530

मलकापूर.
दिनांक – १५/०३/२०२५

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत दुपारी १२.१० ते १२.२५ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.15 17:45:33 +0530

मलकापूर.
दिनांक – १५/०३/२०२५

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

पीडितेची ओळख उघड होणार नाही अशा स्थितीत साक्षीपुराव्याची प्रत मिळाली–

| | |
|---|---|
| सरकारी वकीलांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |